वार्षिक योजना सन २०१५-१६.
राज्यस्तरीय आदिवासी उपयोजने अंतर्गत विदर्भातील सर्व जिल्हयात बांबु लागवडीची कामे घेणेबाबत चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१५/प्र.क्र.१५०(भाग-१)/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०२ जानेवारी, २०१६.

संदर्भ : १) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.०४.२०१५.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.१३/१५-१६/७३७, दि.१६.०७.२०१५.
३) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक बीयुडी-२०१५/प्र.क्र.१६/कार्यासन-६, दि.०४.१२.२०१५

प्रस्तावना :-

सन २०१५-१६ करिता राज्यस्तरीय आदिवासी उपयोजनेंतर्गत विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये बांबू लागवड करणे (४४०६ ३७६९) या योजनेअंतर्गत एकूण रु.१४५०.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सदरहू अर्थसंकल्पित नियतव्ययाच्या अनुषंगाने वनविभागांतर्गत मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर येथील एकूण २९५ हेक्टर क्षेत्रावर बांधील कामे करण्याकरिता रु.२१.२० लक्ष इतक्या रक्कमेचा बांधील कामांचा चालू बाब प्रस्ताव संदर्भ क्र.३ वरील दि.०४.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी शासनास मंजूरीस्तव सादर केलेला आहे.

२. प्रस्तावांतर्गत मागणी केल्याप्रमाणे रु.२१.२० लक्ष इतका निधी वितरित करण्यास आदिवासी विकास विभागास विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने आदिवासी विकास विभागाने संदर्भ क्र.३ वरील दि.०४.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२१.२० लक्ष इतका निधी वन विभागाकडे सुपूर्द केलेला असून सदरचा निधी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.२ वरील दि.१६.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेला प्रस्ताव तसेच आदिवासी विकास विभागाने संदर्भ क्र.३ वरील दि.०४.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वन विभागाकडे सुपूर्द केलेला निधी विचारात घेता मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर येथील बांधील कामांकरिता मागणी केलेला **रु.२१.२० लक्ष (०२ मजुरी)** इतका निधी वितरित व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/

नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दि.१७.०४.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी व शर्तींची पूर्तता करण्यात येईल याची देखिल दक्षता घ्यावी.

५. सदर योजनेवर होणारा खर्च मागणी क्र.टी-०६, प्रधान शीर्ष ४४०६, वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-०१, सामाजिक व कृषि क्षेत्र वनीकरण-७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०२) सर्वसाधारण उपयोगाची झाडे लावणे (४४०६ ३७६९) या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ मध्ये उपलब्ध होणाऱ्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभागाच्या दि.०४.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन तसेच वित्त विभागाच्या दि.१७.०४.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र/१००८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५.०५.२००९ भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०२१७३७०५३३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2016.01.02 17:45:10 +05'30'

(डी.एल.थोरात)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर.
४) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
५) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
६) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
७) आदिवासी विकास विभाग, (का-६) मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
८) जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर
९) ब-१ कार्यासन, म.व व.वि.,मंत्रालय,मुंबई-३२.
१०) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,म. व व.वि,.मंत्रालय,मुंबई-४०० ०३२. ि